नि.फौ.के. नं. ११५/२०२५
महाराष्ट्र शासन वि. शंकर
निशाण क्र. १६

(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपीस रत्नागिरी मध्यवर्ती कारागृह यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.

सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांचा जबाब शपथेवर सुरु.

**नाव** – आकाश मुकुंद शेटये,
**वय –** ३२ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,
**राहणार –** रामपेठ, संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –

**०१**. दिनांक ०९/१०/२०२५ रोजी मी माझ्या घरी हजर असताना पोलीस अधिकारी – श्री गावीत यांनी मला संगमेश्वर–देवरुख जाणाऱ्या रस्त्यावर एस.टी.स्टँडच्या पाठीमागील जागी बोलाविले होते. त्यांनी मला तेथील दुकान फोडुन चोरी झाली असल्याने त्याचा पंचनामा करण्याकरीता बोलावले होते. पोलीसांनी मला व राजेंद्र शांताराम बिर्जे यांना सदर पंचनाम्याकरीता बोलावले होते.

**०२**. सदर ठिकाणी असलेले 'दत्तकृपा मोबाईल शॉपी' फोडुन चोरी झाली होती. तसा पंचनामा तेथे करण्यात आला. तेथे दुकानाचे शटर फोडलेले होते, तेथे चार

कुलुपे, लोखंडी रॉड व १४ – १५ क्रमांकाचा एक पाना पडलेले होते. तेथे नंतर श्वानपथक व फॉरेन्सीकचे पथक, अंगली मुद्रा पथक आले होते. सदर ठिकाणी मिळालेले साहित्य आमच्यासमक्ष पंचनामा करुन त्यास सिलंबद करण्यात आले. पंचनामा व सदर सिलबंद केलेल्या साहित्यांवर माझी व राजेंद्र बिर्जे यांची स्वाक्षरी घेण्यात आली.

**०३**. सदर दुकानातुन मोबाईल, हेडफोन, ब्लुटयुथ इत्यादी चोरीला गेले होते. *(साक्षीदारास निशाणी क्रमांक ११ कडील पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच पंचनामा असुन त्यावर अनुक्रमांक ०१ चा पंच म्हणुन माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.*

**०४**. जप्त केलेला मुद्देमाल मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. *(साक्षीदारास* ***वस्तु अ, ब, क कडील*** *मुद्देमाल दाखविण्यात आला). वस्तु* ***अ कडील लोखंडी रॉड, वस्तु ब कडील ०४ कुलुपे व वस्तु क कडील पाना*** *हा तोच जप्त केलेला मुद्देमाल असुन त्या सर्वांच्या लेबलवर माझी अनुक्रमांक ०१ चा पंच म्हणुन सही आहे.*

**०५**. त्यानंतर, आमची छायाचित्रे घेण्यात आली होती. ती छायाचित्रे दाखविल्यास मी ओळखु शकतो. *(प्रकरणात छायाचित्रांची प्रींट तपासीक अंमलदार यांनी दाखल केली नाहीत.)* सदरची छायाचित्रे पोलीस अधिकारी श्री. गावीत यांच्या मोबाईलवर घेवुन ती ई–साक्ष करण्यात आली होती. साक्षीदार सांगतो की, ई–साक्ष बद्दल मला माहिती असुन पोलीस अधिकारी श्री. गावीत यांनी ती त्यांच्याच मोबाईलवर डाऊनलोड करुन ई–साक्ष ॲपमध्ये अपलोड केली होती.

> *(सहा. सरकारी अभियोक्ता यांनी तोंडी म्हणणे सादर केले की, सदर ई–साक्षची कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्यात आली नाहीत. यावर, बचावपक्षातर्फे विधीज्ञ यांनी दोषारोपपत्र अपुर्ण असल्याने आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात यावी, अशी विनंती केली. सदरची बाब अंतिम*

*युक्तीवाद व न्यायनिर्णयावेळी गृहित धरली जाईल).*

**०६**. त्यानंतर आरोपीला पकडल्यावर मला दाखविण्यात आले होते. आज रोजी आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी आरोपी प्रत्यक्ष न्यायालयामध्ये हजर नसुन व्ही.सी.वरुन दिसत असलेला आरोपी हा तोच आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडून** –

**०७**. मी संगमेश्वर ग्रामपंचायतीमध्ये नोकरीस आहे. माझ्या कामाची वेळ सकाळी ०५:०० ते दुपारी १२:००–१२:३० वाजेपर्यंत असते. मी हजर असलेबाबत हजेरी पत्रकावर माझी स्वाक्षरी घेतली जात नाही. मी हजर असलेबाबत ग्रामपंचायतीकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नसतो. साक्षीदार पुढे सांगतो की, माझे काम पाणी सोडण्याचे असुन आम्ही कामावर हजर झाल्यानंतर सरपंच यांना फोनद्वारे कळते.

**०८**. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामपंचायतीमध्ये नोकरी असल्याने माझे व पोलीसांचे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी अनेक गुन्हयांमध्ये पंच म्हणुन काम पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी पोलीस मला बोलावतात त्यावेळी ते पोलीस ठाण्यात कोऱ्या कागदावर माझी सही घेतात व पोलीस मागाहुन सदर कागदावर त्यांना आवश्यक असलेला मजकुर नमुद करतात. सदर पंचनामा कधी सुरु केला व कधी पुर्ण केला, याची नेमकी वेळ मला आता आठवत नाही. सदर ठिकाणी फिर्यादी – राजेश आंबवकर, पोलीस अधिकारी श्री. गावीत हे देखील तेथे हजर होते.

**०९**. ***प्रश्नः*** *फिर्यादी दिनांक ०९/१०/२०२५ रोजी संध्याकाळी ०७:०९ मिनीटांनी पोलीस ठाण्यात हजर होता, असे फिर्यादीमध्ये नमुद आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?*

***उत्तरः*** *आम्हाला घटनास्थळावर बोलावले होते. फिर्यादी हा आधीच पोलीस ठाण्यात जावुन बसला होता.*

१०. ***प्रश्नः*** *सदरचा फिर्यादी जबाब के. आर. सावंत यांनी नोंदवुन घेतला आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?*

*(सदर प्रश्नावर सहा. सरकारी अभियोक्ता यांनी आक्षेप घेतला की, त्याच्या सदर साक्षीदाराचा काहीही संबंध नाही. त्यामुळे त्यास विचारता येणार नाही. बचावपक्षातर्फे युक्तीवाद करण्यात आला की, पंचनाम्याला निशाणी क्रमांक पडला आहे. त्यामुळे त्यास प्रश्न विचारता येईल.*

*दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व विचारलेल्या प्रश्नाचे स्वरुप पाहता, सदरचा प्रश्न सदर साक्षीदाराशी संबंधीत असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे, सहा. सरकारी अभियोक्ता यांनी घेतलेला आक्षेप संयुक्तिक असल्याने आक्षेप मंजुर. प्रश्न नामंजुर करण्यात येतो).*

११. फिर्यादीने त्याच्या पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, एकाच वेळी एकच व्यक्ती दोन ठिकाणी हजर राहु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस अधिकारी श्री. गावीत यांनी छायाचित्रे घेतल्याचे सदर पंचनाम्यात नमुद करण्यात आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तेथे घेण्यात आलेली छायाचित्रे आज मला न्यायालयात समक्ष दाखविण्यात आली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे तेथे छायाचित्रे घेवुन ई–साक्ष करण्यात आल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा पंचनाम्यावेळी पोलीस ठाण्यात हजर असल्याने त्याने पंचनाम्यावेळी तेथे हजर असल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमालाच्या लेबलवर फिर्यादीची कोठेही सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावेळी फिर्यादी तेथे हजर नव्हता.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन त्याला मदत करण्यासाठी व पोलीसांच्या सांगण्यावरुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात नमुद केलेला मजकुर मला जशास–तसा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वस्तु अ, ब, व क कडील मुद्देमालासारखा मुद्देमाल बाजारात सहज उपलब्ध असतो. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.12 17:57:50 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक १२/०२/२०२६

स्थळः देवरुख

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 12/02/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 12/02/2026 |
| Evidence uploaded on | :- | 12/02/2026 |